नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२५/२०२२ (महम्मद अली अब्बास शेख –वादी वि. इम्तियाज अली शेख वगैरे –प्रतिवादी ) मधील नि. १४ वरील आदेश

.....

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी, यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे न्याय हक्कावर बाधा येणारी असून त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तरी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी क्र. २ तर्फे करण्यात आली आहे.

२. वादीने प्रस्तुतच्या अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन वादीला खर्च देण्याचा आदेश करुन अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ यांना उचितरित्या दाव्याचे समन्स बजावणी होवून ते दाव्याचे कामी हजर झाले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०८, नियम १ अन्वये प्रतिवादी क्र. २ यांना उचित संधी देवून देखील त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीनंतर दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापना व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादीक्र. २ यांना दाव्यामध्ये आपली कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा

खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयाला मदतच होणार आहे . प्रस्तुत प्रतिवादी क्र.२ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही, या निष्कर्षापर्यंत मी आले आहे. सबब, प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रतिवादी क्र. २ यांनी वादीला रक्कम रुपये १००/– (रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देणेचे अटीवर प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.09.29 11:04:35 +0530

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ.

ठिकाण : कुडाळ.
दिनांक – २७/०९/२०२२